# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ ४८७ /२०२४ | पुणे दिनांक - २२/०१/२०२४

श्री मनोज जरांगे पाटील यांचा मराठा आरक्षण मोर्चा दिनांक २३/०१/२०२४ रोजी रांजणगाव येथुन निघुन कोरेगाव भिमा मार्गे चोखीदाणी, खराडी येथे मुक्कामी थांबणार असुन दिनांक २४/०१/२०२४ रोजी चोखीदाणी, खराडी येथुन निघुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतून लोणावळा येथे मुक्कामी थांबणार आहे. श्री मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्च्यामध्ये मोठ्या संख्येने मराठा बांधव वाहनांसह सहभागी होणार असल्याने मोर्चा मार्गावर व आजुबाजुचे परिसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. यास्तव सदर परिसरातील वाहतूक सुरळीत राहणेकरीता तसेच सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, पुणे शहरातील वाहतूकीत खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात बदल करीत आहे.

❖ **दिनांक २३/०१/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वा पासुन पुढिल आदेशापर्यंत खालील नमुद ठिकाणी वाहतूक वळविण्यात येईल**

- **पुणे शहरामधुन अहमदनगर कडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक वळविण्यात आली आहे.**

१. खराडी बायपास येथुन उजवीकडे वळण घेवून मगरपट्टा रोडने नोबल हॉस्पिटल जंक्शन, सोलापूर रोड येथुन डावीकडे वळण घेवून सोलापूर रोडने केडगाव , चौफुला येथुन डावीकडे वळण घेवून नाव्हरामार्गे शिरूर अशी जाईल.

२. चंद्रमा चौक येथुन विश्रांतवाडी, आळंदी, मोशी, चाकण, राजगुरूनगर, पाबळ मार्गे शिरूर अशी जाईल.

३. कात्रज कडुन येणारी वाहतूक मंतरवाडी, हडपसर, सोलापुर रोडने केडगाव , चौफुला येथुन डावीकडे वळण घेवून नाव्हरामार्गे शिरूर अशी जाईल.

४. पिंपरी चिंचवड परिसर तसेच मुंबईकडुन येणारी सर्व प्रकारची वाहतूक हि तळेगाव, चाकण व नाशिक फाटा, भोसरी चाकण पुढे राजगुरूनगर, पाबळ मार्गे शिरूरकडे जाईल.

- **अहमदनगर कडुन पुणे शहराकडे येणारी वाहतूक वळविण्यात आली आहे.**

१. शिरूर ते नाव्हरा मार्गे केडगाव, चौफुला, सोलापूर रोडने हडपसर, पुणे शहर अशी असेल.

२. शिरूर ते पाबळ, राजगुरूनगर, चाकण, भोसरी, पुणे शहर अशी असेल

मोर्चा जसजसा पुढे चालत राहील. तसे आवश्यकतेप्रमाणे पाठी-मागील रस्त्याची वाहतूक सुरू करण्यात येईल.

Borate
22.1.24

**( शशिकांत बोराटे )**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर

**प्रत:- सर्व संबंधीतांना**